ePaper

| वर्ष - 6 | अंक - 223 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 26 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## बाबा रामदेव यांच्या महिलांबाबतच्या वक्तव्याची राज्य महिला आयोगाकडून दखल



**आतील पानांत**

- अजित पवारांचेही 'मी पुन्हा येईन'; 'पण कोणत्या पक्षाकडून?'
- ...म्हणून बोम्मईंनी सीमावाद काढला, हे सगळं स्क्रिप्टेड आहे"
- "केजरीवालांच्या हत्येचा भाजपाचा कट"

# महापालिका प्रशासनावर "कंट्रोल" साठी स्थानिक अधिकाऱ्याचा नाहक 'बळी'!

## शासकीय अधिकाऱ्यांकडून 'लॉबिंग स्ट्रॅटजी' : पण, आमदार, खासदार उल्हास जगतापांच्या पाठिशी

**| पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनात शासकीय अधिकारी विरुद्ध महापालिका अस्थापनेवरील अधिकारी असा संघर्ष पुन्हा जोर धरु लागला आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मर्जीतील अधिकाऱ्याची वर्णी अतिरिक्त आयुक्त- ३ या पदावर लावण्यासाठी आटापीटा करण्यात येत असून, त्यासाठी महसूल विभागाकडून आदेशही निगर्मित केले आहे. शहरातील स्थानिक आमदार आणि खासदार यांनी महापालिका अस्थापनेवरील अधिकाऱ्याची या पदावर नियुक्ती करण्याबाबत आग्रही आहेत. पण, महापालिका प्रशासनावर "कंट्रोल" मिळवण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या 'लॉबिंग स्ट्रॅटजी'चा नाहक बळी स्थानिक अधिकारी होत आहेत का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.**

राज्य शासनच्या माध्यमातून दि. १४ जानेवारी २०१५ रोजी निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अस्थापनेवर 'अतिरिक्त आयुक्त' अभिमानाची ३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २ पदे शासन सेवेतील अधिकाऱ्यांकरिता आणि १ पद महापालिका अस्थापनेवरील MMC ACT SEC-45 अंतर्गत उपायुक्त, नगरसचिव, शहर अभियंता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यापैकी एका पदावरील १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या सेवाज्येष्ठ अधिकाऱ्यांमधून शासनाकडील निवड समितीमार्फत नेमणूक करावी, असा शासन निर्णय आहे. असे असतानाही, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात विकास ढाकणे, जितेंद्र वाघ आणि आयुक्त राजेश पाटील यांची नियुक्ती झाली. त्याकाळात प्रशासकीय सत्ताकेंद्र विकास ढाकणे यांच्या हातात होते. ढाकणे यांच्या बदलीनंतर प्रशासकीय यंत्रणा चालवण्याची सूत्रे जितेंद्र वाघ यांच्याकडे एकवटली. सध्या आयुक्त शेखर सिंह यांच्यानंतर जितेंद्र वाघ महापालिका प्रशासनाचे 'कि पर्सन' आहेत.





### उल्हास जगताप यांची नियुक्ती निश्चित...

महापालिका अतिरिक्त आयुक्त-३ या पदासाठी महापालिका अस्थापनेत एकही अधिकारी पात्र नाही, असे पत्र राज्याच्या नगरविकास विभागाला देणे म्हणजे महापालिका अधिकाऱ्यांवर अन्याय आहे. हा 'कुटील डाव' प्रशासन विभागातील बड्या अधिकाऱ्याकडून सुरू आहे. शासकीय अधिकाऱ्यांचे लॉबिंग करुन प्रशासनावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न आहे, अशी महापालिका अधिकाऱ्यांमध्ये चर्चा आहे. दुसरीकडे, महापालिका कर्मचारी महासंघसुद्धा महापालिकेतील अधिकारीच या पदावर नियुक्त करावा, यासाठी आक्रमक झाला आहे. शिवसेना (शिंदे गट) चे खासदार श्रीरंग बारणे, भाजपाचे आमदार महेश लांडगे आणि लक्ष्मण जगताप यांनी जगताप यांच्यासाठी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस केली आहे. तसेच, चिंचवड विधानसभा मतदार संघाचे भाजपा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेवून महापालिका अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण होईल, अशी भूमिका घेवू नका, असे आवाहन केल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्यामुळे 'मेरिट'च्या आधारावर अतिरिक्त आयुक्त-३ पदावर उल्हास जगताप यांची नियुक्ती कायम होईल, असा दावा जाणकारांकडून केला जातो. आता राज्याच्या नगरविकास विभागाकडून कोणता आदेश येतो? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पेशवेकालीन वास्तुशैलीतील शहरातील एकमेव वास्तू म्हणजे मंगलमूर्ती वाडा...

## इतिहासप्रेमी तरुण मंडळ, चिंचवडच्यावतीने हेरिटेज वॉकचे आयोजन

**| पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी |**

जागतिक वारसा सप्ताह आणि देवदीपावलीचे औचित्य साधत इतिहासप्रेमी तरुण मंडळ, चिंचवड यांनी गुरुवारी (दि. २४) रोजी हेरिटेज वॉक (वारसा फेरी) चे आयोजन केले होते. ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले यांनी चिंचवडगावातील मोरया गोसावी मंदिर, चापेकर वाडा, मंगलमूर्ती वाडा या ऐतिहासिक वारसास्थळांची माहिती दिली. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देवमहाराज, महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) कार्यवाह प्रा. माधव राजगुरू, ज्येष्ठ साहित्यिक शोभा जोशी, प्रदीप गांधलीकर, शिरीष पडवळ, सुभाष चव्हाण, इतिहासप्रेमी तरुण मंडळाचे अध्यक्ष पद्मेश कुलकर्णी यांच्यासह आठ ते ऐंशी वयोगटातील इतिहासप्रेमी नागरिकांनी या उपक्रमांत सहभागी होऊन इतिहास जाणून घेतला.



वारसास्थळांची माहिती देताना श्रीकांत चौगुले म्हणाले की, "जागतिक, राज्यस्तरीय आणि स्थानिक या तीन स्तरांवर किमान शंभर वर्षांपासून जास्त काळ अस्तित्वात असलेल्या प्राचीन स्थळांचा ऐतिहासिक वारसा म्हणून समावेश केला जातो. महासाधू मोरया गोसावी यांच्या संजीवन समाधीनंतर त्यांच्या पुढील पिढीतील आठ सत्पुरुषांच्या समाधिस्थळांचा समूह आध्यात्मिक अन् ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. देशासाठी एकाच कुटुंबातील तीन भावंडांनी पत्करलेल्या हौतात्म्याचे एकमेव उदाहरण असलेल्या चापेकर बंधूंच्या वाड्याचे पुनरुज्जीवन करण्यात आले असले तरी मूळ जागा, चापेकर कुटुंबाचे देव आणि त्यांची शस्त्रास्त्रे लपवून ठेवण्याची विहीर अजूनही मूळ स्थितीत आहे; तर पेशवेकालीन वास्तुशैलीतील पिंपरी-चिंचवडमधील एकमेव वास्तू म्हणजे मंगलमूर्ती वाडा होय. या तिन्ही स्थळांमुळे भारतीय इतिहासात चिंचवडचे स्थान अबाधित आहे "मंगलमूर्ती वाड्यात दीपोत्सव साजरा करून वारसाफेरीचा समारोप करण्यात आला.

# अजित पवारांचेही 'मी पुन्हा येईन'; 'पण कोणत्या पक्षाकडून?'

## चंद्रकांत पाटलांकडून खिल्ली

**पुणे । महाईन्यूज ।**

आज विरोधी पक्षात आहे. उद्या जनतेने सत्तेत बसण्याची संधी दिली, तर मंत्री तर होईनच. मात्र, पुण्याचा पालकमंत्री म्हणून 'पुन्हा येईन' अशी टिप्पणी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी गुरुवारी पुण्यात केली. त्यानंतर काही वेळातच याबाबत पत्रकारांशी विचारल्यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'अजितदादा पुन्हा पालकमंत्री म्हणून परततील, पण कोणत्या पक्षाकडून?,' अशा शब्दांत पवारांची खिल्ली उडवली. पालकमंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीसाठी अजित पवार आले होते. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, 'आज आम्ही विरोधी पक्षात आहोत. उद्या जनतेने सत्तेत बसण्याची संधी दिली, तर मंत्री तर होईनच. मात्र, पुण्याचा पालकमंत्री म्हणून 'पुन्हा येईन.' याबाबत पालकमंत्री पाटील यांना विचारले असता ते म्हणाले, 'अजितदादा पुन्हा सत्तेत येतील. पालकमंत्री म्हणूनही परततील. मात्र, कोणत्या पक्षाकडून हे त्यांनी सांगितले का?'

**शिंदे दर्शनाला चालले, की बळी द्यायला?**

राज्यपालांच्या भूमिकेविरोधात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र बंदचा दिलेल्या इशाऱ्याकडे सकारात्मकतेने पाहतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सर्व आमदारांना घेऊन गुवाहाटीमध्ये ज्या हॉटेलमध्ये होते, तेथील हॉटेलचे देयक न दिल्याने हॉटेल मालकाने आत्महत्या केली. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे दर्शनाला चालले, की बळी द्यायला चालले, ते त्यांनाच माहीत, अशी टीका त्यांनी केली.



श्रद्धा वालकर हत्या प्रकरणाबाबत पवार म्हणाले, 'तपासात कुचराई झाली असेल, तर जलदगती न्यायालयात हा खटला चालविला पाहिजे. सोन्यासारख्या मुलीचे ३५ तुकडे करणाऱ्या नराधमाला तातडीची फाशी दिली, तर चुकीचे ठरणार नाही.

### कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना कडक उत्तर द्यावे

**राज्य सरकारने जत, पंढरपूरकडे लक्ष देऊन स्थानिकांचे प्रश्न सोडवायला पाहिजेत. तेथील नागरिकांना आपलेपणाची वागणूक मिळेल, असे सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी दोघांनी लक्ष दिले पाहिजे. कर्नाटक मुख्यमंत्र्यांच्या सीमावादावरील विधानावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी कडक भाषेत उत्तर दिले पाहिजे, असेही अजित पवार यांनी सांगितले.**

# किसान सभेचे उद्या राज्यभर आंदोलन

**पुणे । महाईन्यूज ।**

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये अर्थसाहाय्य द्यावे, गायरान जमिनी ताबेदारांच्या नावे करा‌व्यात, वन जमिनी, देवस्थान जमिनी कसणारांच्या नावे करण्यात याव्या, कर्जमाफी योजनांची अपुरी अंमलबजावणी पूर्ण करावी, आदी मागण्यांसाठी किसान सभेच्या वतीने २३ नोव्हेंबरपासून राज्यभर आंदोलन सुरू करण्यात आले आहे. तहसील कार्यालयांसमोर मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी धरणे आंदोलने सुरू केले असून, २६ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील तहसील कार्यालयांवर मोर्चे काढून आंदोलन तीव्र करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. किसान सभेच्या



अकोले राज्य अधिवेशनाने महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करून सरकारने शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, पीक विमा कंपन्यांनी बाधित शेतकऱ्यांना अग्रिम व अंतिम भरपाई विनाविलंब द्यावी यासह २३ मागण्यांचे ठराव संमत केले होते. सरकारने मागण्यांची दखल न घेतल्यास २३ नोव्हेंबरपासून राज्यभर आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार राज्यभर आंदोलने सुरू करण्यात आली आहेत.

ठाणे, पालघर, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, अमरावती, वर्धा, नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड, सोलापूर इत्यादी जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने शेतकरी धरणे आंदोलनात सहभागी झाले आहेत. काही जिल्ह्यांमध्ये ग्रामपंचायत आचार संहितेचे कारण पुढे करून प्रशासनाने आंदोलनास परवानगी नाकारली असली, तरी या जिल्ह्यांमध्ये २६ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन प्रशासनाबरोबर विस्तारित बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने अधिक अंत न पाहता शेतकऱ्यांच्या मागण्या तातडीने

# मेट्रोची धाव यशस्वी; वनाज ते जिल्हा सत्र न्यायालय मार्गिकेची चाचणी

## लवकरच प्रवासी सेवा

**पुणे। महाईन्यूज ।**

गरवारे महाविद्यालय ते शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय या २.७५ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेमध्ये मेट्रोची यशस्वी चाचणी शुक्रवारी घेण्यात आली. येत्या काही दिवसांत या मार्गिकेवर चाचण्या घेण्यात येणार असून सर्व यंत्रणांची तपासणी चाचणी दरम्यान करण्यात येणार आहे. त्यानंतर या मार्गावर प्रवासी सेवा सुरू करण्यात येणार आहे. शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयापर्यंत मेट्रो धावल्याने येत्या काही दिवसांत वनाजपासून जिल्हा न्यायालयापर्यंत मेट्रो मार्गिका सुरू होणार आहे. नव्या वर्षात या मार्गिकांवर प्रवासी सेवा सुरू होणार आहे. मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पुण्यात वनाज ते रामवाडी आणि स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड एकूण ३३ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिकांची कामे वेगाने सुरू आहेत. यातील वनाज ते रामवाडी या मार्गिकेअंतर्गत वनाज ते गरवारे महाविद्यालय या साडेतीन किलोमीटर अंतरात मेट्रोची प्रवासी सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यानंतर गरवारे महाविद्यालय ते शिवाजीनगर



सत्र न्यायालय या टप्पा सुरू करण्याचे महामेट्रोकडून जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार ऑगस्ट महिन्यात या मार्गिकेमधील गरवारे महाविद्यालय ते संभाजी उद्यानापर्यंतच्या मार्गिकेत मेट्रोची चाचणी घेण्यात आली होती. त्यापुढील टप्प्यात थेट गरवारे महाविद्यालयापासून शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयापर्यंत मेट्रोची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

# सीरम इन्स्टिट्यूटचे अदर पूनावाला फसवणूक प्रकरणात सात जण गजाआड!

## बंडगार्डन पोलिसांची कारवाई, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश आणि आंध्रप्रदेशातून आरोपींना ताब्यात घेतले

**पुणे । महाईन्यूज ।**

**सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदर पूनावाला यांच्या नावे समाजमाध्यमाद्वारे बनावट संदेश पाठवून एक कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी सात जणांना अटक केली. आरोपींना मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश आणि आंध्रप्रदेशातून ताब्यात घेण्यात आले.**



राजीव कुमार शिवजी प्रसाद (रा. सिवान, बिहार), चंद्रभूषण आनंद सिंग (रा.गोपालगंज, बिहार), कन्हैय्याकुमार संभू महंतो (रा. सिवान, बिहार), रवींद्रकुमार हुबनाथ पटेल (रा. वाराणसी, उत्तरप्रदेश), रावी कौशलप्रसाद गुप्ता (रा. चिंगवाह, मध्यप्रदेश), यासीर नाझीम खान (रा. ग्वाल्हेर, मध्यप्रदेश), प्रसाद सत्यनारायण लोवुडु (रा. विशाखापट्टनम, आंध्रप्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. आरोपींच्या खात्यात जमा झालेली ११ लाख रुपयांची रक्कम गोठविण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. सहायक आयुक्त आर. एन. राजे या वेळी उपस्थित होते.

सप्टेंबर महिन्यात ही घडली होती. याबाबत सीरम इन्स्टिट्यूटचे वित्त विभागातील व्यवस्थापक सागर कित्तुर यांनी फिर्याद दिली होती. सीरम इन्स्टिट्यूटमध्ये सतीश देशपांडे संचालक आहेत.

७ सप्टेंबर रोजी देशपांडे यांच्या मोबाइल क्रमांकावर अदर पूनावाला यांच्या नावे संदेश पाठविण्यात आला होता. त्वरीत एक कोटी रुपये जमा करावेत, असे संदेशात म्हटले होते. आरोपींनी पूनावाला यांचा मोबाइल क्रमांक हॅक करून बनावट संदेश पाठविला होता. देशपांडे सीरम इन्स्टिट्यूटच्या खात्यातून एक कोटी एक लाख एक हजार ५४४ रुपये पाठविले. त्यानंतर त्यांनी पूनावाला यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. तांत्रिक तपासात मिळालेल्या माहितीनुसार चार आरोपींना गेल्या महिन्यात बिहारमधून ताब्यात घेण्यात आले. तपासात अन्य आरोपींची माहिती मिळाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

### 'इंद्रायणी स्वच्छता' जनजागृती मोहिमे अंतर्गत

# रिव्हर सायक्लोथॉनद्वारे "नमामी इंद्रायणी"!

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश : उद्या भव्य रॅलीचे आयोजन

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**'इंद्रायणी स्वच्छता' जनजागृती मोहिमे अंतर्गत आमदार तथा भाजपाचे शहर अध्यक्ष महेशदादा लांडगे यांच्या संकल्पनेतून 'रीव्हर सायक्लोथॉन २०२२' रॅलीचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते रविवारी (दि. २७ नोव्हेंबर) सकाळी पावणे सहा वाजता, भोसरी गावजत्रा मैदान येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती कामगार नेते सचिन लांडगे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.**




मागील पाच वर्षांपासून रीव्हर थॉन रॅली आयोजित करण्यात येत असते. यावर्षी पर्यावरण रक्षणासाठी 'रिसायकल - रिड्युस - रियुज' हा विषय घेऊन 'सायक्लोथॉन' ही मोहीम राबवण्यात येणार आहे. या रॅलीसाठी अभिनेते दिग्दर्शक प्रवीण तरडे, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड सायकलपटू प्रिती म्हस्के, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती सचिन लांडगे यांनी दिली.

यावेळी माजी महापौर नितीन काळजे, पालिका उपायुक्त अजय चारठणकर, रविकिरण घोडके, संयोजन समितीचे डॉ. निलेश लोंढे, शहर अभियंता मकरंद निकम, दिगंबर जोशी, शिवराज लांडगे, डॉ. आनंद पिसे, बापू शिंदे, सुनील बेळगावकर, डॉ. अश्विनी वानखेडे, रविकिरण केसरकर, सीमा शादबार, तृतीय पंथी प्रतिनिधी गायत्री थेरगावकर आदी उपस्थित होते.

भोसरी गावजत्रा मैदानावरून सकाळी पावणे सहा वाजता रॅलीची सुरूवात होईल.

या वर्षी RECYCLE, REDUCE, REUSE TO SAVE ENVIORMENT हि संकल्पना मांडत आहोत. या विशेष कार्यक्रमांतर्गत प्रत्येक घरापर्यंत पोहचण्यासाठी एक विशेष मोहिम राबवून पिंपरी चिंचवड शहरामधील सर्व शाळा, सोसायटी, कंपन्यामध्ये जावून पर्यावरण संवर्धना अंतर्गत सायकल चालवा पर्यावरण वाचवा, नदी स्वच्छता या विषयांतर्गत आम्ही सर्व पर्यावरण प्रेमी जनजागृती करत आहोत व रिव्हर सायक्लोथॉन रॅली मध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करत आहोत.

या अभिनव उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी, पर्यावरण गतविधी, होप मानसिक पुनर्वसन व व्यसनमुक्ती केंद्र, डॉक्टर्स असोसिएशन, फार्मासिस्ट असोसिएशन, वकील संघटना, रोटरी क्लब, लायन्स क्लब, माजी सैनिक संघटना, पतंजली योग, महाराष्ट्रातील सर्व सायकल प्रेमी संस्था, सर्व पर्यावरणप्रेमी संस्था आदींनी पाठींबा दर्शविला असून प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे तृतीय पंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यातील एक रॅली ते लीड करत आहे. उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे. याही वर्षी अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्टस फॉडेशन व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका , पर्यावरणप्रेमी संस्थां यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले आहे.

'इंद्रायणी स्वच्छता' जनजागृती मोहिम अभियान अंतर्गत महानगरपालिकेच्या सर्व शाळा व त्यातील विद्यार्थी आणि खाजगी ६० पेक्षा अधिक शाळांमध्ये शालेय स्तरावर चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आली, यामध्ये १५०००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला , त्यामधून विजेत्या विद्यार्थ्यांमध्ये मनपा स्तरावर आंतर शालेय चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, यामधील विजेत्यांना रिव्हर सायक्लोथॉन मध्ये सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी २५००० सायकलपटू सहभागी होतील अशी माहिती डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.

### रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे -

**5 किलोमीटर** - लहान मुले महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी गाव जत्रा मैदान, लांडगे पेट्रोल पंप, इंद्रायणी नगर, शांतीनगर, गाव जत्रा मैदान;

**15 किलोमीटर** - गाव जत्रा मैदान, जय गणेश साम्राज्य, क्रांती चौक, स्पाईन सिटी मॉल चौक, गवळीमाथा, गाव जत्रा मैदान;

**25 किलोमीटर** - गाव जत्रा मैदान, जय गणेश साम्राज्य, क्रांती चौक, कृष्णानगर, स्पाईन सिटी मॉल चौक, गवळीमाथा, गाव जत्रा मैदान असा आहे.

# महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयास डेंटल एक्स रे मशीन भेट देणार

## माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांचा उपक्रम

**पिंपरी-चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी येथील महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयास माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने कै.सौ.सुमन बाळकृष्ण वाघेरे यांच्या स्मरणार्थ डेंटल एक्स रे मशीन भेट म्हणून देण्यात येणार आहे. याबाबतचे पत्र महापालिकेचे जेष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.ढगे यांना आज देण्यात आले आहे.



कोरोना काळामध्ये महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयात सुरु करण्यात आलेल्या कोविड सेंटर मार्फत अनेक रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले होते. याच काळामध्ये वाघेरे यांच्या वतीने ५० फाऊलर बेड, ४ हाय फ्लो मशीन व २ व्हेटी लेटर भेट स्वरुपात देण्यात आले होते. महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयामध्ये डेंटल युनिट नसल्याने परिसरातील नागरिकांना महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये जावे लागत होते. अश्या नागरिकांना दंत रोग विषयक उपचारासाठी या मशीनमुळे मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे.

कै. सुमन बाळकृष्ण वाघेरे यांच्या स्मरणार्थ १ डिसेंबर रोजी महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयास सदर मशीन भेट स्वरुपात देण्यात येणार आहे. अशी माहिती वाघेरे यांनी दिली.

# हाय-फाय सोसायटीतील मालमत्ता धारकांनी थकविला कर

## महापालिका करसंकलन विभागाने एकाच दिवशी ठोकले ५० सदनिकांना टाळे...

**पिंपरी-चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. एक हजार कोटी रुपयांचे करवसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी करसंकलन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, निवासी सदनिका सील करण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी (दि. २३) एकाच दिवशी विभागाने तब्बल ५० निवासी सदनिका सील केल्या आहेत. तसेच ही कारवाई तीव्र करणार असल्याचा इशारा विभागाने दिला आहे.

शहरातील ५० हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या २६ हजार ७६०, पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या व्यावसायिक १ हजार ३६१ तर मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या ३ हजार ८५० अशा ३१ हजार ९७१ मिळकतधारकांना जप्तीच्या नोटिसा दिल्या आहेत. तीन लाख निवासी मालमत्ताधारकांकडे तब्बल ५८३ कोटी रुपयांचा कर थकीत असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. आत्तापर्यंत २ लाख ८७ हजार ४४६ मालमत्ताधारकांनी ४६६ कोटी रुपये कराचा भरणा केला आहे

थकबाकी असणाऱ्या मालमत्ता जप्त केल्यानंतर अनेक मालमत्ताधारक त्वरित कर भरत आहेत. मात्र, मालमत्ता जप्तीनंतरही काही जण कर भरत नसल्याचे समोर आले आहे.

## संपादकीय »

# जनांचा प्रवाहो चालला...

***शहाणपणास रजा देऊन एकदा का लोकप्रियतेच्या नादी लागण्याची ईर्षा सुरू झाली की पक्षा-पक्षांतील मतभेदाच्या भिंती आपोआप गळून पडतात. मग प्रश्न इतकाच राहतो अधिक अविवेकी कोण?***

हा प्रश्न अलीकडच्या काळात सातत्याने समोर येत असला तरी आता तो पडायचे कारण म्हणजे विविध राज्य सरकारांचा पुन्हा एकदा जुन्या निवृत्तिवेतन योजनेकडे जाण्याचा निर्णय. विकसित देशांत प्रत्येकाला आपापली सोय स्वत: पाहावी लागते. 0आणि गुंतवणुकीवर जे काही मिळणार वा मिळणार नाही त्याचा हिशेब डोक्याने होतो. भावनेने नाही. आपल्याकडे हे अशक्य. त्यामुळे निवृत्तिवेतनासारख्या संकल्पना अजूनही टिकून आहेत. सरकारी सेवेचे अजूनही आपल्याकडे आकर्षण आहे ते निवृत्तीनंतरची समस्या नसते यामुळे. सरकारी सेवा करतो म्हणजे तमाम नागरिकांवर आपण काही उपकार करतो असा अनेक कर्मचाऱ्यांचा आविर्भाव. त्यामुळे भरभक्कम निवृत्तिवेतन हा आपला जणू अधिकारच असे त्यांस वाटते. एकविसाव्या शतकापर्यंत हे खपून गेले. परंतु जसजसे सरासरी आयुष्यमान वाढत गेले तसतसा सरकारांचा निवृत्तिवेतन खर्च मोठ्या प्रमाणात वाढत गेला. अनेकांबाबत प्रत्यक्ष सेवा कालापेक्षा निवृत्तिवेतनाचा कालावधी किती तरी अधिक असल्याचे दिसून आले. दीर्घ आयुर्मान केव्हाही स्वागतार्हच. तथापि त्याचा खर्चभार इतरांवर पडत असल्याचे दिसून आल्याने पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी नवी निवृत्ती योजना रुजू केली. नंतर काँग्रेसच्या मनमोहन सिंग सरकारने ती सुरू ठेवली आणि आता १८ वर्षांनंतर काँग्रेस, आप आणि कदाचित भाजपही जुन्या निवृत्तिवेतन योजनेकडे वळण्याचा आग्रह धरतो त्यास काय म्हणावे?

नव्या योजनेत कर्मचारी आपल्या सेवा काळात दरमहा वेतनातील १० टक्के रक्कम निवृत्तिवेतनाच्या तरतुदीसाठी वळती करतो. सरकार या निधीसाठी आता १४ टक्के रक्कम देते. हा निधी निवृत्तिवेतन संबंधित प्राधिकरणाने घालून दिलेल्या नियमांनुसार विविध ठिकाणी गुंतवला जातो. यातून जी काही पुंजी जमा होते ती सदर कर्मचाऱ्यास निवृत्तीनंतर मासिक वेतनाच्या रूपाने परत केली जाते. याउलट जुन्या निवृत्तिवेतन योजनेत सर्वच्या सर्व खर्च केवळ सरकारनेच करण्याची प्रथा होती. तथापि हा भार भविष्यात पेलणारा नाही हे लक्षात आल्याने वाजपेयी सरकारच्या काळात सहभाग, वर्गणीद्वारे निवृत्तिवेतनाचा रास्त मार्ग निवडला गेला. त्यामुळे १ एप्रिल २००४ पासून सरकारी सेवेत दाखल झालेल्या सर्वास नव्या निवृत्ती योजनेत सहभागी करून घेतले गेले. तथापि या योजनेद्वारे मिळणारे निवृत्तिवेतन पुरेसे नाही असा हाकारा करीत या नव्या योजनेविरोधात राष्ट्रीय पातळीवर सध्या एक मोहीमच हाती घेण्यात आल्याचे दिसते.

# आर्थिक आरक्षण घटनाबाह्य






संसदेने आर्थिक दुर्बल घटकांना केवळ 'आर्थिक निकषावर' केंद्र सरकारच्या सेवांमध्ये आणि केंद्रीय व खासगी शिक्षणसंस्थांमध्ये दहा टक्के राखीव जागा ठेवण्याची तरतूद करणाऱ्या १०३ व्या घटना दुरुस्तीवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. ही तरतूद राज्यांना बंधनकारक नाही. खंडपीठाने तीन विरुद्ध दोन असा हा निकाल दिला असला, तरी दोन न्यायमूर्तींनी 'आर्थिक निकष' मान्य केला आहे. आर्थिक आरक्षण मान्य करणारी १०३ वी घटन दुरुस्ती आणि सर्वोच्च न्यायालयाचे तिच्यावरचे शिक्कामोर्तब हे राज्यघटनेतील सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला छेद देते. ही घटना दुरुस्ती विरोधाभासाने भरलेली असूनही सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक आरक्षण 'घटनाबाह्य' कसे, हे पाहायला हवे.

राज्यघटनेच्या कलम १४ मध्ये नमूद केलेली 'कायद्यापुढील समानता' हा घटनेचा गाभ्याचा भाग आहे. त्यानुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान इ. कोणत्याही आधारे 'भेदभाव' करता येत नाही. कलम १५ अनुसार देशातील सर्व सार्वजनिक स्थळे सर्व नागरिकांना खुली आहेत. मात्र, जन्माधिष्ठित जातिव्यवस्थेमुळे असणारी संधींची विषमता आणि त्याचा परिणाम म्हणून जाती, जमाती व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिलेल्या समूहांसाठी राखीव जागांची निर्मिती करण्याचे ठरले. या संदर्भात दोन गोष्टी ध्यानात घ्यायला हव्यात. पहिली केवळ त्याचा परिणाम म्हणून आता मोदी सरकारला केंद्रीय शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये दहा टक्के राखीव जागा देणीसाठी केवळ 'आर्थिक' वापरणारी १०३ वी घटना दुरुस्ती करावी लागली.

नेहरू सरकारने १९५३ मध्ये नेमलेल्या काका कालेलकर आयोगाने १९५५ मध्ये अहवाल दिला. त्यात अन्य मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक राखीव जागांसाठी पुढील निकष वापरले : एक, भारतातील पारंपारिक जातिव्यवस्थेच्या उतरंडीत खालचे स्थान; दोन, एखादी जात व समूहामध्ये मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक प्रगतीचा अभाव; तीन, शासकीय सेवांमध्ये कमी व अजिबात प्रतिनिधित्व नसणे; आणि शेवटी, व्यापार, तत्सम व्यवसाय आणि उद्योगांमध्ये कमी प्रतिनिधित्व असणे. सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या घटकांसाठी राखीव जागांची तरतूद करण्यासाठी कालेलकर आयोगाने वापरलेले निकष ध्यानात घेतले; तर आर्थिक दुर्बल घटकांसाठी फक्त आर्थिक निकष वापरणे राज्य घटनेशी कसे विसंगत आहे, हे स्पष्ट होते.

विश्वनाथ प्रताप सिंग सरकारने ज्या आधारे सामाजिक व शैक्षणिक मागासांना (ओबीसी) राखीव जागा देण्याचा निर्णय घेतला, त्या मंडल आयोगाने तर कालेलकर आयोगाच्या पुढे झेप घेतली. ओबीसी कोण, हे निश्चित करण्यासाठी आयोगाने विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती नेमली. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व अल्प प्रमाणात आर्थिक निकष ध्यानात घेतले. त्यांची पद्धत शास्त्रशुद्ध अशासाठी की त्यांनी या तीन निकषांना 'भारांक' (वेटेज) म्हणजे भिन्न महत्त्व दिले. उदाहरणार्थ, चार सामाजिक निकषांना प्रत्येकी तीन पॉईंट्स, तीन शैक्षणिक निकषांना प्रत्येकी दोन पॉईंट्स आणि चार आर्थिक निकषांना एकेक पॉइंट दिला. म्हणजे, अकरा निकषांना २२ पॉईंट्स दिले. ज्या समूह वा जातींना किमान १२ पॉईंट्स मिळतील, ते राखीव जागांना पात्र ठरले. याप्रकारे मंडल आयोगाने तीन हजार ७५० समूह (जनसमूह किंवा जाती) राखीव जागांना पात्र ठरवले. या पार्श्वभूमीवर केवळ आर्थिक निकषांच्या आधारे राखीव जागा निर्माण करणे, ही राजकीय स्वार्थासाठी सरकारने केलेली विसंगती व्यावहारिकदृष्ट्या समजण्यासारखी आहे. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने त्या विसंगतीला मान्यता देणे, हा घटनेवर अन्याय आहे., अशी तरतूद कलम १४ मध्ये अंतर्भूत असलेल्या समानतेच्या तत्त्वाला बाधा आणत नाही, हे कलम १५ व १६ मध्ये स्पष्ट केले आहे. दुसरी, अशी राखीव जागांची तरतूद करण्याबाबत घटना समितीत एकमत होते. परंतु त्याचा निकष काय असावा, यावर मतभेद होते. काहींना आर्थिक निकष मान्य होता; तर काहींचा त्याला विरोध होता. सामाजिक व शैक्षणिक विषमता हे आर्थिक विषमतेचे उगमस्थान आहे, असे पंडित नेहरूंचे मत होते. डॉ. आंबेडकरांचा तर फक्त आर्थिक निकष वापरायला पूर्ण विरोध होता. शेवटी, घटना समितीत राखीव जागांच्या निर्मितीसाठी 'आर्थिक निकष' वापरणे अमान्य झाले. अनुसूचित जाती व जमाती सोडा, अन्य मागास वर्गासाठीही आर्थिक निकष अमान्य झाला. त्यामुळे 'सामाजिक आणि शैक्षणिक मागास' असा शब्दप्रयोग घटनेत आला. घटतेनील राखीव जागांची तरतूद जाती, जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास समूहांसाठी आहे. व्यक्तींसाठी नाही. १०३ व्या घटना दुरुस्तीत 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक' असे म्हटले असले, तरी ती तरतूद 'व्यक्ति-कुटुंब सापेक्ष' आहे.

# 'अंतराळ- अर्थव्यवस्थे'त भारताची झेप...

**भारतात खासगीरीत्या विकसित झालेले 'विक्रम-एस' हे यान गेल्या आठवड्यात झेपावले, यात टीका करण्यासारखे काही नाहीच, उलट जागतिक अंतराळ-व्यवसायाच्या स्पर्धेत आता भारतही पावले टाकतो आहे, याचे कौतुक झाले पाहिजे...**

'विक्रम एस' रॉकेटचे – म्हणजे उपग्रहवाहकयानचे – प्रक्षेपण गेल्या शुक्रवारी (१८ नोव्हेंबर) करण्यात आले, ते यशस्वी झाल्याचे आता स्पष्ट होणे हा भारताच्या अंतराळ प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला आहे. अंतराळझेप आपण यापूर्वीही घेतली असली तरी, हे खासगीरित्या तयार केलेले पहिलेच भारतीय रॉकेट आहे आणि भारतीय स्टार्ट-अप्सच्या मोठ्या सहभागासाठी भारतीय अंतराळ कार्यक्रम खुला करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धरलेल्या आग्रहाचा परिणाम आहे. विक्रमची 'प्रारंभ' मोहीम ही एक चांगली सुरुवात असली तरी, अंतराळ कार्यक्रमांमध्ये खासगी क्षेत्राच्या सहभागाबाबत उर्वरित जगाच्या तुलनेने भारताला बरेच अंतर पार करायचे आहे. दिल्लीने सक्षम धोरणात्मक वातावरण तयार केल्यास ते अंतर कमी करण्याची क्षमता आणि अनुभव देशाच्या खासगी क्षेत्राकडे आहे.



विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अंतराळ कार्यक्रम ही सरकारी मक्तेदारी ठरली होती. पण एकविसाव्या शतकात खासगी क्षेत्राची भूमिका हां-हां म्हणता विस्तारली आहे. एकेकाळी उपग्रहांची मालकी फक्त सरकारकडे होती पण आज खासगी कंपन्या उपग्रह व्यवसायात आघाडीवर आहेत. इलॉन मस्कची 'स्टारलिंक उपग्रह प्रणाली' आता पृथ्वीच्या समीप-कक्षेत २,३०० हून अधिक उपग्रह सोडणारी मोठी खासगी आस्थापना ठरली आहे – हे उपग्रह, रशियन सैन्याविरुद्धच्या लढ्यात युक्रेनच्या सशस्त्र दलांना उपयुक्त लष्करी माहितीसह विविध अवकाश सेवा पुरवू लागले आहेत.

ब्रॉडबँड इंटरनेटसह अनेक सेवा देण्यासाठी 'ॲमेझॉन'च्या 'प्रोजेक्ट कुइपर'ने येत्या काही वर्षांत तीन हजारांहून अधिक उपग्रह प्रक्षेपित करण्याची योजना आखली आहे. यासाठी दिवसाला किमान तीन उपग्रह तयार करावे लागतील. भारतातील 'एअरटेल' ही 'वनवेब कॉर्पोरेशन'मध्ये भागीदार असून या 'वनवेब'चे सध्याच जवळपास ५०० उपग्रह इंटरनेट सेवा पुरवण्यासाठी कार्यरत आहेत.

अंतराळ कार्यक्रम अनेक देशांचे आहेत, अनेक खासगी कंपन्यांनाही आपापल्या कामासाठी उपग्रह वापरावे लागतात, अशा वेळी सर्वाधिक मागणी असलेले क्षेत्र म्हणजे उपग्रह प्रक्षेपकांचे किंवा वाहकांचे. या क्षेत्रावर अलीकडेपर्यंत सरकारची मक्तेदारी होती. इलॉन मस्कच्या 'स्पेस-एक्स'ने ही प्रक्षेपणाची मक्तेदारी मोडून काढली आहे आणि लवकरच 'ॲमेझॉन' चे 'ब्लू ओरिजिन' हे रॉकेटदेखील दाखल होणार आहे..

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### कोकण, पश्चिम महाराष्ट्रात पावसाळी वातावरण; दक्षिण कोकणात पाऊस

। मुंबई । महाईन्यूज ।

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातून येणाऱ्या बाष्पामुळे दक्षिणेकडील राज्यांत सध्या पाऊस होत असून, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील दक्षिण कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात काही भागांत झाला आहे. या विभागात अंशत: ढगाळ वातावरण निर्माण झाले असून, काही भागांत हलक्या सरींनी हजेरी लावली. पुढील दोन ते तीन दिवस पावसाळी स्थिती कायम राहणार आहे. विदर्भात मात्र हलकी थंडी राहणार आहे.

त्यामुळे त्याला कंपनीवर विश्वास निर्माण झाला होता. २६ ऑक्टोंबरला त्याने पुन्हा कंपनीत १८ हजार रुपयांच्या कर्जासाठी अर्ज केला होता. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रभावामुळे गेल्या आठवड्यात राज्यातील तापमानात मोठी घट झाली होती. २० आणि २१ नोव्हेंबरला राज्याच्या सर्वच भागातील किमान तापमानात ४ ते ६ अंशांनी घट होऊन थंडीचा कडाका वाढला होता.

# ...म्हणून बोम्मईंनी सीमावाद काढला, हे सगळं स्क्रिप्टेड आहे”

## संजय राऊतांचा भाजपावर गंभीर आरोप!

। मुंबई। महाईन्यूज ।

गेल्या दोन दिवसांपासून महाराष्ट्रात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्यावरून गदारोळ चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. “शिवाजी महाराज जुने आदर्श झाले, आता नितीन गडकरी-शरद पवार हे आदर्श आहेत”, असं वक्तव्य राज्यपालांनी केलं होतं. त्यावरून आता विरोधकांनी भाजपावर आणि सत्ताधाऱ्यांवर आगपाखड करायला सुरुवात केली आहे. राज्यपालांना महाराष्ट्रातून परत पाठवण्याची मागणी ठाकरे गटासह महाविकास आघाडीकडून करण्यात येत आहे. यानंतर दुसरीकडे



कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईंनी सीमाप्रश्नावरून केलेल्या विधानावर वाद सुरू झाला. यावर माध्यमांशी बोलताना संजय राऊतांनी आज भाजपावर गंभीर आरोप केले आहेत.

### “हे फार मोठं कारस्थान”

कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी केलेलं विधान आणि उकरून काढलेला वाद हे फार मोठं कारस्थान असल्याचा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. “कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी महाराष्ट्रावर जो अचानक हल्ला केला आहे, यामागे फार मोठं कारस्थान आहे. महाराष्ट्रात भाजपाच्या नेत्यांकडून शिवाजी महाराजांचा अपमान झाला आहे. राज्यपाल कोश्यारी, सुधांशु त्रिवेदी यांनी शिवाजी महाराजांवर चिखलफेक केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात सरकारच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे. त्याच्यावरून लक्ष विचलित व्हावं, म्हणून बोम्मईंना पुढे करून महाराष्ट्रातल्या काही गावांवर हक्क सांगण्याचा प्रयत्न आहे. जेणेकरून लोकांनी दुसऱ्याविषयाकडे वळावं आणि शिवाजी महाराजांचा अपमान विसरावा”, असं संजय राऊत म्हणाले आहेत. “कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना लिहून दिलेलं स्क्रीप्ट”

“असं नसतं, तर भाजपाचा एक मुख्यमंत्री भाजपाच्या दुसऱ्या राज्यावर असा हल्ला करताना देशात कुठे दिसत नाही. कधी पाहिलंय का तुम्ही की योगींनी गुजरातच्या मुख्यमंत्र्यांवर हल्ला केला? तो एक शिस्तबद्ध पक्ष आहे. त्यामुळे कर्नाटकचे भाजपाचे मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या भाजपाच्या उपमुख्यमंत्र्यांवर बोलणं ही ठरलेली स्क्रिप्ट आहे.

### “सर्वात मोठ्या लढाईसाठी आम्ही तयार”

**“जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात असे विषय निर्माण होतात, तेव्हा काहीतरी वेगळा विषय काढला जातो. राज्यपालांनी मुंबई-ठाण्यातल्या मराठी माणसाचा अपमान केला तेव्हाही गोंधळ झाला. तेव्हा लक्ष विचलित करण्यासाठी संजय राऊतांना अटक झाली. आताही तसंच आहे. त्याविरोधात उद्धव ठाकरेंनी काल रणशिंग फुंकलंय. आम्ही सगळ्यात मोठ्या लढाईसाठी तयार आहोत. ती लढाई कोणत्याही थराला जाईल”, अशा शब्दांत संजय राऊतांनी भाजपाला आव्हान दिलं आहे.**

# १५ वर्षांपेक्षा जुनी सरकारी वाहनं भंगारात जाणार

## नितीन गडकरींची घोषणा!

। नागपुर। महाईन्यूज ।

रस्त्यावर धावणारी १५ वर्षे जुनी सर्व सरकारी वाहने मोडीत काढावी लागणार असून त्यासाठी स्क्रॅपिंग युनिट लावण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. या संदर्भात सर्व राज्यांना निर्देश देण्यात आले असल्याचेही ते म्हणाले. नागपुरात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारत सरकारची किंवा भारत सरकारच्या अखत्यारीत असलेली सर्व सरकारी वाहने १५ वर्षांनंतर मोडीत काढावी लागणार आहेत. १५ वर्ष जुने कोणतेही सरकारी वाहन रस्त्यावर धावू शकणार नाही. यासंदर्भातील निर्देश सर्व राज्यांना



देण्यात आले असून या गाड्या मोडीत काढण्यासाठी लवकरच स्क्रॅपिंग युनिट लावण्यात येणार आहे, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली आहे. तसेच सर्व राज्यांनी त्यांच्या डेपोमधील १५ वर्ष जुन्या बस, ट्रक आणि इतर वाहनेसुद्धा मोडीत काढावी, असेही ते म्हणाले.

दरम्यान यापूर्वी सरकारने दिल्ली आणि एनसीआरमधील १० वर्ष जुन्या डिझेल आणि १५ वर्ष जुन्या पेट्रोलवरील वाहनांवर बंदी घातली घालण्याचा निर्णय घेतला होता.

**भारत सरकारची किंवा भारत सरकारच्या अखत्यारीत असलेली सर्व सरकारी वाहने १५ वर्षांनंतर मोडीत काढावी लागणार आहेत. १५ वर्ष जुने कोणतेही सरकारी वाहन रस्त्यावर धावू शकणार नाही. यासंदर्भातील निर्देश सर्व राज्यांना देण्यात आले असून या गाड्या मोडीत काढण्यासाठी लवकरच स्क्रॅपिंग युनिट लावण्यात येणार आहे, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली आहे.**

# प्रशासनाच्या नकारात्मक भूमिकेमुळे दीड हजार कोटींचे प्रकल्प रखडले

## खासदार सुनील तटकरे यांचा आरोप

। अलिबाग । महाईन्यूज ।

अलिबाग जिल्हा प्रशासनाच्या नकारात्मक भुमिकेमुळे आरसीएफचा प्रस्तावित मिश्र खत प्रकल्प आणि अलिबागच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम थांबले आहे. जनतेच्या दृष्टीने हे दोन्ही प्रकल्प महत्वाचे आहे. दोन्ही प्रकल्पामुळे या परिसरात दीड हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेऊन हे दोन्ही प्रकल्प तातडीने मार्गी लावायला हवेत, असे मत खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. ते अलिबाग येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सुधाकर घारे आणि अमित नाईक उपस्थित होते. आरसीएफच्या प्रस्तावित मिश्र खत प्रकल्पासाठी जनसुनावणी आयोजित करण्यात




आली होती. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत ही सुनावणी स्थगित केली. ही सुनावणी तातडीने घेणे आवश्यक आहे. आरसीएफच्या मुख्य महाव्यवस्थापकांनी विशिष्ट दिवसात जनसुनावणी झाली नाही, तर आरसीएफचा प्रकल्प अलिबाग मध्ये होऊ शकणार नाही अशी शक्यता व्यक्त केली आहे. हा प्रकल्पच अलिबागला आला नाही. तर आरसीएफच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्नही सुटू शकणार नाही. त्यामुळे हा प्रकल्प लोकांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. सकारात्मक भुमिका आणि तातडीची पाऊले उचलली गेली पाहीजेत असे मतंही त्यांनी यावेळी व्यक्त केले. हा प्रकल्प इतर राज्यात गेला त्यास सर्वस्वी जिल्हा प्रशासन जबाबदार असेल असा स्पष्ट इशारा त्यांनी यावेळी दिला.

जवळपास बारा वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अलिबागला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर झाले आहे. एमआयडीसीने उसर येथील जागा या महाविद्यालयासाठी मोफत उपलब्ध करून दिली आहे. या महाविद्यालयाच्या जागेवर संरक्षक भिंत बांधण्याचे काम सुरु करण्यात आले होते. हे काम जिल्हाधिकारी यांनी रोखले आहे. स्थानिक शेतकऱ्यांची वहिवाट बंद होणार असल्याचे कारण यासाठी पुढे केले जात आहे. शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा प्रश्न सोडविला जाऊ शकतो त्यासाठी सुरु असलेले काम बंद करण्याचे कारण नाही. प्रशासनाने हा निर्णय कोणाच्या दबावामुळे घेतला हे तपासावे लागेल. जनतेच्या हीताच्या प्रकल्पांना असा विरोध व्हायला नको असेही ते म्हणाले.

पंतप्रधान ग्रामीण आणि शहरी आवास योजनेत रायगड जिल्ह्याचे काम अतिशय निराशाजनक आहे. ग्रामिण भागातील एकही प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही. तर शहरीभागात रोहा नगरपालिका हद्दीतील ४५ घरकुलांचा अपवाद वगळता उर्वरीत नगरपालिकेचे काम शुन्य आहे. ही चिंतेची बाब आहे. प्रशासनाने शासकीय योजनांबाबत सजग असले पाहीजे. शासकीय योजनांचा लाभ जनसामान्यांना जास्तीत जास्त कसा होईल यासाठी प्रयत्न करायला हवे. कुडा लेणी आणि डॉ. सलीम अली यांचे स्मारक यांची कामांना स्थगिती देण्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# “केजरीवालांच्या हत्येचा भाजपाचा कट”

## मनीष सिसोदिया यांचा गंभीर आरोप

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दिल्लीत आम आदमी पार्टी आणि भाजपामध्ये यांच्यात जोरदार संघर्ष पाहायला मिळत आहे. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी भाजपावर गंभीर आरोप केला आहे. गुजरात विधानसभा निवडणूक आणि दिल्ली महापालिका निवडणुकीतील पराभवाच्या भीतीनं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या हत्येचा कट रचला जात आहे, असे सिसोदिया यांनी म्हटले आहे. दिल्लीतील भाजपा खासदार मनोज तिवारी या कटात सामील असल्याचंही ते म्हणाले आहेत. सिसोदियांच्या या गंभीर आरोपांना मनोज तिवारींनी पत्रकारपरिषद घेत प्रत्युत्तर दिले आहे.**



**मनीष सिसोदिया यांनी पत्रकारपरिषद घेत सांगितले की, “मनोज तिवारींनी केजरीवाल यांना धमकी दिली आहे. या धमकीमुळे स्पष्ट झाले आहे की, “भाजपा अरविंद केजरीवालांची हत्या करण्याचा कट रचत आहे. षडयंत्रात अडकवण्याच्या कटात भाजपा यशस्वी होऊ शकली नाही, यामुळे आता असा कट रचत आहे. मनोज तिवारींना कसं माहिती की केजरीवालांवर हल्ला होऊ शकतो? या संपूर्ण प्रकरणाची तक्रार आम्ही निवडणूक आयोगाकडे करू आणि मागणी करू की हत्येची धमकी देण्यासाठी मनोज तिवारींना अटक केली जावी.”**

मनीष सिसोदियांच्या आरोपांनंतर मनोज तिवारींनी पत्रकारपरिषद घेत म्हटले की, “मी काल अरविंद केजरीवालांच्या सुरक्षेची चिंता व्यक्त केली आहे. मला तर वाटतं की ते सुरक्षित रहावेत. ज्याप्रकारे त्यांचे आमदार मार खात आहेत. ज्याप्रकारे त्यांच्या एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला आहे. ही सर्व परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. आमचं ट्वीट वाचा आम्ही काय लिहिलं आहे. ही जी हत्या आणि हत्येच्या धमकीची स्क्रीप्ट आहे, ही आम आदमी पार्टीची फार जुनी स्क्रीप्ट आहे.” याचबरोबर तिवारींनी पत्रकारपरिषदेत मनीष सिसोदियांच्या ट्वीटची प्रत दाखवत सांगितले की, “भाजपा केजरीवालची हत्या घडवू इच्छिते असे यामध्ये आहे आणि हे २०१९ चे ट्वीट आहे. म्हणजेच हा आरोप दरवर्षी केला जातो, केवळ वर्ष बदलतं मात्र यांचा आरोप तोच राहतो.”

याशिवाय “आम्हाला सजमत नाही की अरविंद केजरीवाल वारंवार मनीष सिसोदीयांना तुरुंगात टाकण्याचं बोलत राहतात आणि मनीष सिसोदीया केजरीवालांच्या हत्येची भविष्यवाणी करत आहेत. त्या दोघांचे आपसात काय सुरु आहे, हे आम्हाला समजण्यापलीकडे आहे.” असंही मनोज तिवारींनी यावेळी बोलून दाखवलं.

मनीष सिसोदिया यांनी पत्रकारपरिषद घेत सांगितले की, “मनोज तिवारींनी केजरीवाल यांना धमकी दिली आहे. या धमकीमुळे स्पष्ट झाले आहे की,

## आनंद तेलतुंबडेंना दिलासा; सर्वोच्च न्यायालयाने NIA ची याचिका फेटाळली!

**। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भीमा कोरेगाव हिंसाचाराशी कथितरित्या संबंध आणि शहरी नक्षलवादाच्या आरोपप्रकरणी तळोजा कारागृहात बंदिस्त असलेले प्रा. आनंद तेलतुंबडे यांना उच्च न्यायालयाने मागील आठवड्यात जामीन मंजूर केला होता. उच्च न्यायालयाच्या या निर्णया विरोधात एनआयएने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. ज्यावर आज(शुक्रवार) सुनावणी पार पडली. या सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालायचा जामीनाचा निकाल कायम ठेवत, एनआयएची याचिका फेटाळली. यामुळे तेलतुंबडे यांना दिलासा मिळाला आहे.

भारताचे मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती हिमा कोहली यांच्या खंडपीठाने सांगितले की, ते उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नाहीत.

१८ नोव्हेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर करताना, प्रा. तेलतुंबडे यांचा दहशतवादी कारवायांमध्ये सकृतदर्शनी सहभाग दिसत नसल्याची टिप्पणीही केली होती. त्यांच्यावर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३८ आणि ३९ (दहशतवादी संघटनेच्या सदस्यत्वाशी संबंधित) अंतर्गत दाखल गुन्हे केले आहेत. तथापि, गुन्ह्यांत दोषी ठरल्यास तेलतुंबडे यांना कमाल शिक्षा १० वर्षे तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. त्यांनी आधीच



## सहा शहरं, लॉजवर छापे अन्...; राहुल गांधींना बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा नरेंद्र सिंह सापडला



**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

मध्य प्रदेश पोलिसांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला अटक केली आहे. पोलिसांनी गुरुवारी या व्यक्तीला अटक केली असून या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांना बऱ्याच ठिकाणी तपास करावा लागला. मात्र पोलिसांच्या तपासाला यश आलं आणि ही व्यक्ती त्यांच्या जाळ्यात अडकली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दया उर्फ प्यारे उर्फ नरेंद्र सिंह असं अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव आहे. उज्जैनमधील नागदा परिसरामधून या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. सध्या या व्यक्तीचा ताबा इंदूर पोलिसांकडे आहे. या व्यक्तीनेच राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी दिली होती. राहुल गांधी इंदूरमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांना बॉम्बने उडवून टाकू, असं या धमकीच्या पत्रात म्हटलं होतं. राहुल गांधींची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रातून मध्य प्रदेशमध्ये दाखल झाली आहे. याच यात्रेच्या पार्श्वभूमीवर हे पत्र लिहिण्यात आलं होतं. नरेंद्र सिंहला अटक करण्यासाठी पोलिसांनी जवळजवळ २०० सीसीटीव्ही तपासले. या सीसीटीव्हीमधील शेकडो फुटेज पोलिसांनी तपासून पाहिली. पोलिसांनी हॉटेल, रेल्वे स्थानके आणि लॉजवर छापेमारी केली.

# राजस्थानमध्ये पुन्हा काँग्रेस विरुद्ध काँग्रेस!

## अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील वाद चव्हाट्यावर

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**राजस्थान काँग्रेसमधील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी सचिन पायलट यांना लक्ष्य केलं असून ‘गद्दार’ असा उल्लेख केला आहे. “सचिन पायलट हे गद्दार आहेत. मुख्यमंत्री म्हणून माझ्या जागी त्यांना मुख्यमंत्री केलं जाऊ शकत नाही,” असं वक्तव्य अशोक गेहलोत यांनी केलं आहे. अशोक गेहलोत यांच्या टीकेला सचिन पायलट यांनीही प्रत्युत्तर दिलं आहे.**



अशोक गेहलोत यांनी केलेले आरोप खोटे आणि बिनबुडाचे असल्याचं सचिन पायलट यांनी सांगितलं आहे. तसंच याची काहीच गरज नव्हती असंही म्हटलं आहे. “अशोक गेहलोत यांनी मला अक्षम तसंच गद्दार असं म्हटलं असून अनेक आरोप केले आहेत. हे सर्व आरोप खोटे आणि निराधार आहेत,” असं सचिन पायलट म्हणाले आहेत.

काँग्रेस पक्षाला मजबूत करणं याकडे लक्ष देणं जास्त गरजेचं असल्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. “राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा यशस्वी कशी होईल याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. कारण सध्या देशाला याची गरज आहे,” असं मत सचिन पायलट यांनी मांडलं आहे.


“देशात फक्त काँग्रेस पक्षच भाजपाला आव्हान देऊ शकतो. गुजरातमध्ये निवडणुका होणार असून अशोक गेहलोत प्रभारी आहेत. भाजपाचा पराभव करण्यासाठी आपण एकत्र आलं पाहिजे,” असं सचिन पायलट यांनी म्हलं आहे.

पुढील वर्षा राजस्थानमध्ये होणाऱ्या निवडणुकांकडेही त्यांनी लक्ष वेधलं. “अशोक गेहलोत यांच्या नेतृत्वाखाली आम्ही दोन वेळा राजस्थानमध्ये सरकार स्थापन केलं. पण त्यानंतर दोन वेळा पराभव झाला. पण त्यानंतही पक्ष नेतृत्वाला त्यांनीच सरकार चालवावं असं वाटत आहे. आम्ही तेदेखील मान्य केलं. यावेळी आमचं लक्ष आगामी निवडणूक जिंकण्याकडे असलं पाहिजे”.

पायलट यांनी २०२०मध्ये बंडखोरी केली होती, इतकंच नव्हे तर आपल्याच पक्षाचं सरकार पाडण्याचाही प्रयत्न केला होता, त्यामुळे त्यांना मुख्यमंत्री बनवलं जाऊ शकत नाही, असं गेहलोत म्हणाले. पायलट यांच्या बंडामागे भाजपचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा हात होता असा आरोप करून गेहलोत म्हणाले, “काँग्रेसच्या काही आमदारांना गुडगाव येथील रिसॉर्टवर एक महिन्याहून अधिक काळ डांबून ठेवण्यात आलं होतं आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान तेथे वारंवार भेट देत होते.

पायलट यांच्यासह बंडखोर आमदारांना दहा कोटी रुपये देण्यात आले होते. त्याचे पुरावेही माझ्याकडे आहेत.”

## हिरवा चुडा, हातभर मेहंदी आणि साजश्रृंगार करत सजल्या पाठकबाई,



‘तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या घराघरात पोहोचलेला राणादा आणि पाठकबाई म्हणजेच अभिनेता हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत.

त्या दोघांच्या घरी सध्या लगीनघाई सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या केळवणाचे आणि बॅचलर पार्टीचे फोटो समोर आले होते. त्यानंतर आता अक्षया देवधरचा नववधूच्या वेशातील एक व्हिडीओ समोर आला आहे.

अक्षया देवधर ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. नुकतंच तिने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्याला दिलेल्या कॅप्शनने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. “तुम्ही मला नववधूच्या वेशात पाहण्यासाठी उत्सुक आहात का?” असा प्रश्न तिने कॅप्शनद्वारे चाहत्यांना विचारला आहे. अक्षयाने शेअर केलेल्या या व्हिडीओत ती निळ्या रंगाच्या साडीत दिसत आहे. यावर तिने छान मोत्यांचे दागिनेही परिधान केले आहेत. त्याबरोबर तिच्या हातात हिरवा चुडाही पाहायला मिळत आहे. तसेच तिने छान मोत्याची नथही नाकात घातली आहे. याबरोबर तिच्या हातावर छान मेहंदीही रंगल्याचे दिसत आहे. तिने या पोशाखाला साजेसा मेकअप आणि हेअरस्टाईलही केली आहे. त्याबरोबर तिने केसात गजराही माळल्याचे दिसत आहे. अक्षयाच्या या व्हिडीओवर अनेक चाहत्यांनी कमेंट केल्या आहेत. ‘किती गोड आहात तुम्ही वहिनी’, अशी कमेंट तिच्या एका चाहत्याने केली आहे. ‘लय भारी आणी खुप छान दिसताय बघा तुम्ही’, असे एकाने म्हटले आहे. ‘आम्ही फार उत्सुकतेने लग्नाची वाट पाहतोय’, अशी कमेंटही एका व्यक्तीने केली आहे.

## गिरीजा ओक करणार मनमोहक अदांनी घायाळ

राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त ‘गोष्ट एका पैठणीची’ या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. यात एका पैठणी घेण्याचे स्वप्न असलेल्या गृहिणीची गोष्ट दाखवण्यात आली आहे. या सर्वसामान्य स्वप्नाची पूर्तता करताना तिच्या आयुष्यात येणाऱ्या काही अनपेक्षित घटनांचा हा रंजक प्रवास आहे. नुकतीच ‘गोष्ट एका पैठणीची’ चित्रपटातील एक ठसकेबाज लावणी सर्वांच्या भेटीला आली आहे. या लावणीची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. अभिनेत्री गिरीजा ओक हिने ही लावणी सादर केलेली आहे.

‘तुमच्यासाठी रेडी राया नेसून पैठणी’ असे या गाण्याचे बोल आहेत. यात गिरीजा ओक ही पैठणी नेसून, मनमोहक अदांनी घायाळ करणाऱ्या नृत्यांगणेच्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. बेला शेंडे यांच्या आवाजाने या लावणीला चारचांद लागले आहेत. तर या गाण्याचे बोल आणि संगीत माणिक – गणेश यांचे आहे. गिरीजा ओक -गोडबोले आणि मिलिंद गुणाजी यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात



आले आहे. या गाण्यात पैठणीचे सौंदर्य अधोरेखित करण्यात आले आहे. “महाराष्ट्राचे महावस्त्र असणाऱ्या पैठणीचे सौंदर्य प्रत्येकाला भारावणारे आहे. या चित्रपटात ‘पैठणी’ सुद्धा एक महत्वाची व्यक्तिरेखा आहे. पैठणीचे सौंदर्य आम्ही या लावणीतून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. खूप सुंदर बोल असणारी ही लावणी ठेका धरायला लावणारी आहे. गाण्याच्या रेकॉर्डिंगदरम्यान बेलाही खूप एन्जॉय करून गात होती. त्यामुळे तिला बघून आम्हीही हे गाणं तितकंच एन्जॉय केले”, अशी प्रतिक्रिया चित्रपटाचे दिग्दर्शक शंतनू रोडे यांनी दिली आहे. “या गाण्याचे बोल खूप सुंदर आहेत. संगीतही तितक्याच ताकदीचे आहे. त्यामुळे हे गाणे गाताना मलाही खूप मजा आली. हे गाणं गाताना आम्ही एवढी धमाल केली तर प्रेक्षकांना तर हे गाणं नक्कीच ठेका धरायला लावेल”, अशी प्रतिक्रिया गायिका बेला शेंडे यांनी दिली आहे. गोष्ट एका पैठणीची’ची निर्मिती अक्षय विलास बर्दापूरकर, अभयानंद सिंग, पियुष सिंग, सौरभ गुप्ता यांनी केली आहे. तर अश्विनी चौधरी, चिंतामणी दगडे, सौम्या मोहंती-विळेकर, गायत्री दिलीप चित्रे हे चित्रपटाचे सहनिर्माते आहेत.

## प्रशांत दामले यांना कलाक्षेत्रातील मानाचा पुरस्कार जाहीर;

अभिनेते प्रशांत दामले हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठी नाट्यसृष्टीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी अनेक लोकप्रिय नाटकांमध्ये महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयाचे लाखो चाहते आहेत. नुकताच त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमधला १२ हजार ५०० वा नाट्यप्रयोग सादर केला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे तसंच कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी आवर्जून उपस्थित होती. प्रशांत दामले नाट्यसृष्टीत जितके सक्रीय असतात तितकेच ते सोशल मीडियावरदेखील असतात. नुकतीच त्यांनी एक पोस्ट शेअर केली आहे ज्यावरून त्यांना चाहते अभिनंदन करत आहेत. पोस्टमध्ये ते असं म्हणालेत, “आपल्या सर्वांच्या अलोट प्रेमामुळे व आशीर्वादामुळे मला संगीत नाटक अकादमी पुरस्कार जाहीर झाला.. असच प्रेम असूदे” या शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. संगीत नाटक अकादमी पुरस्कार हा कलाक्षेत्रातील एक मोठा पुरस्कार मानला जातो. संगीत, नाट्य आणि नृत्य क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार दिला जातो. विविध कलाक्षेत्रातील कलावंतांना देण्यात येणारा हा एक सर्वोच्च भारतीय सन्मान आहे. कुमार गंधर्व, भीमसेन जोशी, किशोरी आमोणकर यांसारख्या दिग्गज कलाकारांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



प्रशांत दामले यांनी त्यांच्या विनोदीबुद्धीने प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. नाटकांच्या बरोबरीने त्यांनी चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्याचबरोबर ते पाककृतीशी निगडित असलेल्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करतात. प्रशांत दामले सध्या वर्ष उसगावकर यांच्याबरोबर ‘सारखं काहीतरी होतंय’ या नाटकात दिसत आहेत. अनेक वर्षांनंतर ही जोडी रंगमंचावर दिसत आहे

## राम कपूर यांनी घेतलेल्या फेरारी गाडीची चर्चा;

छोट्या पडद्यावरील जोड्यांपैकी एकेकाळी अनेकांच्या मनावर राज्य करणारी जोडी म्हणजे अभिनेता राम कपूर आणि अभिनोत्री गौतमी कपूर. ‘घर एक मंदिर’ या मालिकेतू राम आणि गौतमी एकत्र झळकले होते. राम कपूर यांच्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. सध्या अनेक अभिनेते आलिशान घर विकत घेत आहेत, मात्र राम कपूर यांनी चक्क कोट्यवधी रुपयांची गाडी विकत घेतली आहे.



आज स्टार्स लोकांकडे अनेक महागड्या गाड्या असतात. राम कपूर यांनी नुकतीच फेरारी कंपनीची गाडी विकत घेतली असून त्याची भारतातील किंमत ३.५० कोटी आहे. राम कपूर यांच्याकडे १. कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची PORSCHE 911 CARRERA S गाडीदेखील आहे. आज फेरारी कंपनीच्या गाड्या सचिन तेंडुलकरपासून ते नागा चैतन्यसारख्या अभिनेत्यांकडे आहेत. राम कपूर यांनी घेतलेल्या गाडीला ३.८ लिटरचे इंजिन असून ६०० HP तर टॉर्क ७६० इतका आहे. ही गाडी ३.५ सेकंदात ०-१०० किमी प्रतितास जाऊ शकते. राम कपूर यांनी घेतलेल्या या गाडीची सध्या सगळीकडे चर्चा आहे. सोशल मीडियावर या गाडीचा फोटो व्हायरल होत आहे. राम कपूर आणि गौतमीने अनेक हिंदी मालिकांमध्ये काम केलंय. मात्र ‘घर एक मंदिर’ या मालिकेतील त्यांच्या जोडीला प्रेक्षकांनी मोठी पसंती दिली होती.

# लॅथम-विलियम्सनच्या जोडीने भारतीय गोलंदाजांची काढली पिसे!

## न्यूझीलंडचा सात गडी राखून विजय

दोहा।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारत-न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेला आजपासून सुरुवात झाली. पुढीलवर्षी भारतात होणाऱ्या ५० षटकांच्या विश्वचषकाची तयारी ही भारताने न्यूझीलंडविरुद्धच्या याच मालिकेपासून सुरु केली होती. परंतु पहिल्याच सामन्यात भारतीय गोलंदाजी किती कमकुवत आहे न्यूझीलंडच्या टॉम लॅथम आणि कर्णधार केन विलियम्सन यादोघांनी दाखवून दिले. न्यूझीलंडने टीम इंडियावर सात गडी राखून विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. शतकवीर टॉम लॅथमला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

न्यूझीलंडने फिन ॲलन (२२), डेव्हॉन कॉनवे (२४) आणि डॅरील मिचेल (११) यांना ८८ धावांत



सुरुवातीलाच गमावले. कर्णधार केन विलियम्सन व टॉम लॅथम यांनी डाव सावरला. न्यूझीलंडचे सलामीवीर फारशी काही चमकदार कामगिरी करू शकले नाही. केन विलियम्सन आणि टॉम लॅथम यांच्या २२१ धावांच्या भागीदारीमुळे किवी संघाने सात गडी राखून लक्ष्य गाठले. या विजयासह न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. न्यूझीलंडने ४७.१ षटकांत ३ बाद ३०९ धावा करून विजय मिळवला. केन ९८ चेंडूंत ७ चौकार व १ षटकारासह ९४ धावांवर,तर लॅथम १०४ चेंडूंत १९ चौकार व ५ षटकारांसह १४५ धावांवर नाबाद राहिले. न्यूझीलंड डावाच्या ३६व्या षटकात भारताला कर्णधार शिखर धवनने ढिसाळ क्षेत्ररक्षण करत किवी कर्णधार केन विलियम्सनचा साधा झेल सोडला आणि तिथूनच सामन्याला खरी कलाटणी मिळाली. अनअनुभवी टीम इंडियाच्या गोलंदाजांचा लॅथम-विलियम्सन जोडीने फायदा उठवत शार्दूल ठाकूरच्या एका षटकात तब्बल २५ धावा चोपल्या. भारताविरुद्ध त्याने हे दुसरे शतक झळकावले. त्याआधी त्याने कोलकाताच्या इडन गार्डनवर भारताविरुद्ध शतकी खेळी केली होती.

तत्पूर्वी, शिखर धवनच्या नेतृत्वाखाली भारताच्या दोन युवा गोलंदाजांनी यांनी एकदिवसीयमध्ये पदार्पण केले. टी२० मध्ये शानदार प्रदर्शन केलेला डावखुरा स्विंग गोलंदाज अर्शदीप सिंग आणि भारताची तोफ समजल्या जाणाऱ्या वेगवान गोलंदाज उमरान मलिक या दोघांना आजच्या सामन्यात अंतिम अकरामध्ये स्थान देण्यात आले होते. त्याने दोन गडी बाद केले. तर शार्दूल ठाकूरला एक गडी बाद करण्यात यश आले. ऑकलंड येथे सुरु असलेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकत भारतीय संघाला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. टीम इंडियाने ते आमंत्रण स्वीकारत कर्णधार शिखर धवन आणि शुभमन गिल यांनी १२४ धावांची सलामी भागीदारी दिली. २४ षटकात भारताने १२४ धावा केल्या होत्या.

## कतार फिफा विश्वचषकामध्ये सीएसकेची हवा

पुणे ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



जगातील सर्वात मोठी लीग इंडियन प्रीमियर लीग सुरू होण्यासाठी अवघे काही महिने बाकी आहेत. आयपीएल २०२३ (IPL 2023) च्या सर्व १० संघांनी रिलीज आणि रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी बीसीसीआयला सादर केली आहे. तसेच सद्या कतारमध्ये फिफा विश्वचषक २०२३ या फुटबॉल स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत आयपीएल संघ चेन्नई सुपर किंग्ज संघाचा एक चाहता धोनीच्या नावाची जर्सी घालून ब्राझीलचा सामना पाहिला गेला होता. ज्याचे फोटो आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

आयपीएल फ्रँचायझी चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार असलेल्या धोनीचे जगभरात चाहते आहेत. दरम्यान, कतारमध्ये सुरू असलेल्या फिफा विश्वचषकाच्या ब्राझील संघाच्या फुटबॉल सामन्यादरम्यान एका चाहत्याने सीएसके कर्णधार धोनीच्या नावाची आणि नंबरची जर्सी घातलेला दिसला. ज्याचे फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहे. सीएसकेने आपल्या ट्विटर हँडलवर त्याचा फोटो शेअर केला आहे. याशिवाय कंपनीनेही दिले आहे. त्यांनी लिहिले आहे की "आपण जिथे जातो तिथे सर्वत्र पिवळेच असते." चेन्नई सुपर किंग्जचा सध्याचा कर्णधार एमएस धोनी आयपीएल २०२३ नंतर निवृत्त होण्याची शक्यता. धोनीनंतर संघाला चांगल्या कर्णधाराची गरज आहे. एमएस धोनीने त्याच्या नेतृत्वाखाली सीएसकेला चार वेळा आयपीएल चॅम्पियन बनवले आहे. गेल्या मोसमात संघाने भारतीय अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाकडे संघाची कमान सोपवली होती. पण जडेजा त्याच्या नेतृत्वाखाली विशेष कामगिरी दाखवू शकला नाही. त्यानंतर धोनीने पुन्हा संघाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली.

यावेळी मिनी लिलावापूर्वी केन विल्यमसन आणि ड्वेन ब्राव्हो सारखी अनेक मोठी नावे समोर आली, ज्यांना संघांनी करार मुक्त केले आहे. दरम्यान, धोनीनंतर कर्णधारपदासाठी चेन्नई सुपर किंग्जच्या नजरा यावेळी मिनी लिलावाकडे आहेत.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही